# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १७ जानेवारी २०१८

## ( बैठक क्र. १६१ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | आगामी पाच वर्षात पाच लाख रोजगार<br>**उद्योजकता विकसित करण्यासाठी राज्याच्या स्टार्ट-अप धोरणास मान्यता** | कौशल्य विकास व उद्योजकता |
| २. | **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणेसह अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यास मान्यता** | ग्राम विकास |
| ३. | **ग्रामपंचायतींना मिळणार स्वत:ची इमारत**<br>**बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेस मान्यता** | ग्राम विकास |
| ४. | **भूसंपादन अधिनियम-२०१३ मध्ये सुधारणा**<br>**सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित होणाऱ्या ग्रामीण भागातील जमिनींसाठी चार पट मोबदला** | महसूल |
| ५. | **कोल्हापूर विमानतळास छत्रपती राजाराम महाराजांचे नाव** | सामान्य प्रशासन |
| ६. | **नागपूर विमानतळाशी संबंधित कामांच्या प्रस्तावांसाठी दस्तावेजांना मंजुरी** | सामान्य प्रशासन |
| ७. | **सिडको प्रकल्पबाधितांना २२.५ टक्के विकसित भूखंड** | नगर विकास (१) |
| ८. | **औद्योगिक प्रयोजनासाठीच्या जमिनींच्या हस्तांतरणासाठी आता २५ टक्के शुल्क** | नगर विकास (१) |
| ९. | **मराठवाड्यातील दुष्काळावरील उपाययोजनांसाठी इस्त्रायलच्या मेकोरोट कंपनीसोबत सामंजस्य करार** | पाणी पुरवठा व स्वच्छता |
| १०. | **पुनर्वसनासाठी क्रांतिकारक निर्णय**<br>**अनाथ मुलांना एक टक्के आरक्षण मंजूर** | महिला व बालविकास |
| ११. | **अधिनियमामध्ये सुधारणेस मंजुरी**<br>**जलसंधारण महामंडळाच्या सदस्य संख्येत वाढ** | मृद् व जलसंधारण |

आगामी पाच वर्षात पाच लाख रोजगार

**उद्योजकता विकसित करण्यासाठी**

**राज्याच्या स्टार्ट-अप धोरणास मान्यता**

राज्यात उद्योजकता वाढीस लागावी आणि त्यासोबतच नवनवीन संकल्पनांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला चालना मिळावी यासाठी राज्यात स्टार्ट-अप धोरण राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार पुढील पाच वर्षात जैवतंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमता, माहिती तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा निर्मिती आदी वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १५ टक्के इतका असून भविष्यात तो अधिक वाढावा यासाठी राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासास चालना देण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यासोबतच मोठ्या संख्येने असलेल्या तंत्रकुशल तरुणाईला रोजगार उपलब्ध व्हावा यासाठीही उद्योजकतेचा सर्वांगीण विकास गरजेचा आहे. तरुणांना स्वत:चे उद्योग उभारता यावेत यासाठीही अनुकूल वातावरण निर्माण होण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली या विभागाचे राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील तसेच ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्या सह-अध्यक्षतेतील महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या माध्यमातून हे धोरण तयार करण्यात आले आहे.

या धोरणाच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांच्या (२०१७-२०२२) कालावधीत विविध उद्दिष्ट्ये साध्य करण्यात येणार आहेत. त्यात शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रांच्या सहाय्याने किमान १५ इनक्युबेटर्सचा विकास करून एंजल व सीड फंडच्या माध्यमातून पाच हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणे, किमान दहा हजार स्टार्ट-अप सुरु करण्यास सहाय करणे, या सर्व उपाययोजनांच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाच लाख तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे या उद्दिष्टांचा समावेश आहे. या धोरणानुसार नोंदणी झाल्यापासून सात वर्षे कालावधीची आस्थापना ही स्टार्ट-अप म्हणून गणली जाईल. मात्र, सामाजिक क्षेत्र आणि बायोटेक्नॉलॉजी स्टार्टअपसाठी हा कालावधी दहा वर्षे इतका राहील. तसेच स्टार्ट-अपची वार्षिक उलाढाल २५ कोटी रुपयांच्या मर्यादेत असणे आवश्यक ठरविण्यात आले आहे.

स्टार्ट-अप उद्योगांना ठराविक नमुन्यात स्वयं-प्रमाणित माहिती सादर करण्याची मुभा राहील. तसेच सात वर्षांच्या कालावधीत त्यांचे कोणतेही निरीक्षण केले जाणार नाही. स्टार्ट-अप संस्कृती विकसित करण्यासाठी ठराविक नियमांमध्ये शिथिलता देऊन निविदा प्रक्रियेत पूर्वानुभव अथवा उलाढाल या निकषांमध्ये सूट देण्यात येईल. शासनाचे सहाय्य प्राप्त करणाऱ्या उद्योगांनी स्टार्टअपकडून किमान १० टक्के खरेदी, मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्काची पहिल्या टप्प्यात १०० टक्के आणि दुसऱ्या टप्प्यासाठी ५० टक्के भरपाई, भारतीय पेटंटसाठी २ लाख रुपयांपर्यंत आणि आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी १० लाख रुपयांपर्यंत (८० टक्के मर्यादेत) सवलत, गुणवत्ता परीक्षणासाठी केलेल्या खर्चाच्या ८० टक्के रकमेची शासनाकडून भरपाई, राज्य वस्तू व सेवा कराच्या रकमेची (SGST) शासनामार्फत प्रतिपूर्ती इत्यादी सवलती धोरणात अंतर्भूत आहेत.

या धोरणांतर्गत स्टार्ट-अप करिता नाविन्यपूर्ण क्लस्टर विकसित करण्यात येतील. त्याचप्रमाणे स्टार्ट-अप उद्योगांना विविध प्रकारच्या सेवा व सुविधा पुरविण्यासाठी उच्च शैक्षणिक संस्था, संशोधन व विकास संस्था आणि औद्योगिक क्षेत्र यांच्या सहकार्याने इन्क्यूबेटर्स (Virtual Incubator सह), तीन जागतिक

दर्जाचे Accelerators, Scalerators व स्टार्टअप पार्क विकसित करण्यात येतील. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शाळांमध्ये टिंकरिंग लॅब उभारण्यात येतील.

स्टार्ट-अप ना निधी उपलब्ध होण्याकरिता फंड ऑफ फंडस् द्वारे ५०० कोटी रुपयांचा निधी स्थापित करुन क्राऊड फंडींगच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रातील स्टार्ट-अप उद्योगांना ५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. यासोबतच ग्रँड चॅलेंजेस स्टार्टअप वीक सारखे कार्यक्रम आयोजित करुन राज्याला भेडसावणाऱ्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकींसाठी संबंधितांना आमंत्रित करण्यात येईल व त्यातील निवडक संकल्पनांना शासकीय निधीचा लाभ घेता येईल.

-----०-----

ग्राम विकास विभाग

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणेसह अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यास मान्यता

राज्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचाची थेट जनतेतून निवड करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ च्या संबंधित कलमांमध्ये सुधारणेसह अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतमान्यता देण्यात आली.

यासंदर्भात राज्यपालांनी १९ जुलै २०१७ रोजी काढलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात आले होते. मात्र, अधिवेशन ११ ऑगस्ट २०१७ रोजी संस्थगित झाल्याने ते मंजूर होऊ शकले नाही. या अध्यादेशातील तरतूदी सुरु राहाव्यात यासाठी तो १ सप्टेंबर २०१७ रोजी पुनर्प्रख्यापित करण्यात आला. संबंधित विधेयक विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विधानसभेत मंजूर करण्यात आले. या विधेयकात विधानपरिषदेतील सदस्यांनी सूचविलेल्या सुधारणांप्रमाणे संमती देण्यात आली. मात्र, सुधारणा केलेले विधेयक विधानसभेमध्ये ठेवण्यापूर्वीच अधिवेशन २२ डिसेंबर २०१७ रोजी संस्थगित झाल्याने त्यास संमती मिळू शकली नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या अध्यादेशाची मुदत २१ जानेवारी २०१८ रोजी संपत आहे. अध्यादेशातील तरतुदी यानंतरही चालू राहण्यासाठी तो नव्याने पुनर्प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांना विनंती करण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----

## ग्रामपंचायतींना मिळणार स्वत:ची इमारत

## बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेस मान्यता

स्वतंत्र कार्यालयीन इमारत नसलेल्या राज्यातील ग्रामपंचायतींसाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सुरू करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा लाभ लोकसंख्येने लहान, आर्थिकदृष्ट्या कमकुवत अथवा दुर्गम भागातील सुमारे ४ हजार २५२ ग्रामपंचायतींना मिळणार आहे.

या योजनेनुसार स्वतंत्र इमारत नसलेल्या १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १२ लाख आणि १००० ते २००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १८ लाख निधी मंजूर करण्यात येणार आहे. या निधीपैकी ९० टक्के रक्कम राज्य शासनामार्फत मिळणार असून १० टक्के रक्कम स्वनिधीतून उभारणे आवश्यक आहे. या ग्रामपंचायतींना सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर देखील इमारत उभारता येणार आहे. तसेच २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना स्वनिधीतून अथवा सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर इमारत उभारता येईल.

सार्वजनिक-खाजगी भागीदारी किंवा आज जाहीर केलेली मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना यापैकी कोणत्या योजनेतून ग्रामपंचायत कार्यालय बांधावयाचे आहे याबाबत संबंधित ग्रामसभेने ठराव करणे आवश्यक आहे. १००० ते २००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींनी इमारत बांधण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागिदारी संदर्भात किमान दोन वेळा प्रयत्न करणे आवश्यक आहे. पीपीपी तत्त्वावर बांधकाम करण्यास प्रतिसाद मिळाला नसल्यास आज जाहीर केलेल्या योजनेतून इमारत उभारण्यास मान्यता मिळणार आहे.

शासकीय-खाजगी भागीदारीतून बांधकाम करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेने स्वतंत्र धोरण ठरविण्यास मान्यता देण्यात आली आहे. मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना राबविण्यासाठी २०१७-१८ या वर्षासाठी २५ कोटी इतका निधी राखून ठेवण्यात आला असून हा निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी प्रतीवर्षी साधारणपणे ११० कोटीप्रमाणे पुढील चार वर्षांमध्ये ४४० कोटींची तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली. सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून ग्रामपंचायतींचे बांधकाम करण्यात आल्यास तेवढा निधी कमी लागू शकतो.

-----०-----

## भूसंपादन अधिनियम-२०१३ मध्ये सुधारणा
## सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित होणाऱ्या ग्रामीण भागातील जमिनींसाठी चार पट मोबदला

सार्वजनिक प्रयोजनासाठी राज्यात भूसंपादन अधिनियम-२०१३ या कायद्यासह इतर काही कायद्यांनुसार खाजगी जमिनींचे संपादन करण्यात येते. ग्रामीण भागातील जमिनीसाठी भूसंपादन अधिनियम-२०१३ नुसार देण्यात येणारी बाजारभावाच्या चार पट रक्कम इतर कायद्यांनुसार देता येण्यासाठी २०१३ च्या अधिनियमात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आजच्या निर्णयानुसार भूसंपादन अधिनियम-२०१३ मधील कलम १०५ (अ) व शेड्यूल पाच मध्ये राज्यातील चार कायद्यांचा समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये महाराष्ट्र राष्ट्रीय महामार्ग अधिनियम-१९५५, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम-१९६१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम-१९७६ आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम-१९६६ यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे या चार राज्य कायद्यांतर्गत भूसंपादन करताना देखील ग्रामीण भागातील भूधारकास बाजारभावाच्या चार पट मोबदला मिळणार आहे.

याशिवाय राज्याने वाटाघाटीद्वारे थेट खरेदीने खाजगी जमिनी ताब्यात घेण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसारही जास्तीत जास्त खाजगी जमीन शासकीय प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या संमतीने ताब्यात घेण्यात येते. त्यासाठी ग्रामीण भागातील जमीनधारकास बाजारमूल्याच्या पाच पट मोबदला देण्यात येतो.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग (विमान चालन)

## कोल्हापूर विमानतळास छत्रपती राजाराम महाराजांचे नाव

कोल्हापूर येथील विमानतळाचे छत्रपती राजाराम महाराज विमानतळ, कोल्हापूर असे नामकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर येथे विमानतळाची उभारणी केल्यानंतर १९३९ मध्ये त्याचे उद्घाटन करण्यात आले होते. सद्य:स्थितीत शासनाच्या प्रयत्नातून या विमानतळाचा विकास करण्यात येत असून प्रादेशिक जोडणी योजना (उडान) मधून लवकरच विमान सेवा सुरु करण्यात येणार आहे. कोल्हापूर विमानतळाच्या निर्मितीत छत्रपती राजाराम महाराज यांचे योगदान विचारात घेऊन राज्य शासनाने विमानतळाच्या नामकरणाची केंद्राकडे शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार नामकरण प्रस्तावास आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहाची मान्यता घेऊन केंद्र शासनाच्या नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहे.

-----o-----

सामान्य प्रशासन विभाग (विमान चालन)

## नागपूर विमानतळाशी संबंधित कामांच्या प्रस्तावांसाठी दस्तावेजांना मंजुरी

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उन्नतीकरण, आधुनिकीकरण, देखभाल ही कामे सार्वजनिक-खासगी भागीदारीतून आणि संकल्पना, बांधणी, वित्त सहाय्य पुरविणे, चालविणे आणि हस्तांतर करणे (DBFOT) या तत्त्वावर करण्यासाठी आवश्यक दस्तावेजांना आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक विमानतळ (मल्टी-मोडल इंटरनॅशनल कार्गो हब अॅण्ड एअरपोर्ट अॅट नागपूर - Multi-modal International Cargo Hub and Airport at Nagpur) विकसित होत आहे. या प्रकल्पात नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि विशेष आर्थिक क्षेत्र व संलग्न सेवा-व्यवसाय असे दोन उपप्रकल्प समाविष्ट आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारताच्या केंद्रस्थानी असणारे महत्त्वाचे विमानतळ आहे. सध्या मिहान इंडिया लि. या कंपनीमार्फत हे विमानतळ चालविण्यात येत आहे. मिहान इंडिया या संयुक्त कंपनीमध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (MADC) आणि भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांचा अनुक्रमे ५१ व ४९ टक्के हिस्सा आहे. या दोन घटकांनी केलेल्या करारनाम्यानुसार या विमानतळाचा विकास खासगी विकासकाकडून करण्याचे मान्य करण्यात आले आहे.

या विमानतळाचे उन्नतीकरण, आधुनिकीकरण, देखभाल ही कामे सार्वजनिक - खासगी भागीदारीतून (PPP) करणे तसेच संकल्पना, बांधणी, वित्त सहाय्य पुरविणे, चालविणे आणि हस्तांतर करणे (DBFOT) या तत्त्वावर करण्याबाबत २३ जुलै २०१७ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन अर्हतेकरिता विनंती (RFQ-Request For Quotation) प्रक्रियेद्वारे पाच कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. या पाच कंपन्यांकडून प्रस्ताव मागविण्यासाठी, प्रस्तावाकरिता विनंती (RFQ-Request For Proposal) आणि सवलत करारनामा (Concession Agreement) या दस्तऐवजांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

-----o-----

नगर विकास विभाग (१)

## सिडको प्रकल्पबाधितांना
## २२.५ टक्के विकसित भूखंड

सिडको महामंडळातर्फे जमीन संपादन करून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प बाधितांना २०१३ च्या जमीन संपादन कायद्यातील तरतुदींपेक्षा जास्त मोबदला देण्यासह त्यांचे लाभदायक पुनर्वसन करण्यासाठी प्रकल्पबाधित व्यक्तींना २२.५ टक्के विकसित भूखंड वाटप करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासह नवी मुंबई प्रकल्पास चालना देण्यासाठी १ मार्च २०१४ व २८ मे २०१४ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पबाधितांना २२.५ टक्के विकसित भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच निर्णयाप्रमाणे सिडकोतर्फे राबविण्यात येणाऱ्या नेरूळ येथील नैना प्रकल्प, बेलापूर-सीवूड-उरण रेल्वे कॉरिडॉर प्रकल्प व मुंबई पारबंदर प्रकल्प (एम.टी.एच.एल.) तसेच सिडकोकडून भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विविध विकास प्रकल्पांकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६(१) अ आणि (ब) अन्वये खाजगी मालकीची जमीन वाटाघाटीद्वारे संपादन कार्यप्रणालीअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना २२.५ टक्के विकसित भूखंड देण्यास मंजुरी देण्यात आली.

तसेच २२.५ टक्के योजनेंतर्गत देय असेलेला भूखंड ४० चौरस मीटरपेक्षी कमी असल्यास महसूल व वन विभागाच्या मार्च २०१५ मधील अधिसूचनेनुसार जमिनीचा मोबदला ठरवून रोख रक्कम भरपाई म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

नगर विकास विभाग (१)

## औद्योगिक प्रयोजनासाठीच्या जमिनींच्या
## हस्तांतरणासाठी आता २५ टक्के शुल्क

एमआयडीसीच्या औद्योगिक क्षेत्रातील जमिनी संपादित करून औद्योगिक घटकांना भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या आणि कालांतराने नागरी जमीन कायद्यानुसार सूट प्राप्त झालेल्या अशा जमिनींच्या हस्तांतरणासाठी १०० टक्क्यांऐवजी आता २५ टक्के शुल्क आकारण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनिमय) अधिनियम-१९७६ च्या कलम २० नुसार उद्योगांना औद्योगिक प्रयोजनार्थ वापर करण्यासाठी शुल्क आकारणीतून सूट देण्यात आली आहे. या जमिनीच्या हस्तांतरणासाठी २३ नोव्हेंबर २००७ च्या शासन निर्णयानुसार हस्तांतरण शुल्क निश्चित करण्यात आले आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील सूट देण्यात आलेल्या जमिनी तसेच बंद उद्योगाच्या जमिनी आय.टी. पार्क, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र, गारमेंट पार्क, ज्वेलरी पार्क, इलेक्ट्रॉनिक पार्क यासारखे उद्योग विकसित करण्यासाठी तसेच इतर औद्योगिक वापरासाठी हस्तांतरित करावयाचे झाल्यास अशा प्रकरणी १०० टक्क्यांऐवजी २५ टक्के हस्तांतरण शुल्क आकारण्यात येईल. या शुल्कातील ६० टक्के रक्कम राज्य शासनास तर ४० टक्के रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जमा करण्यात येणार आहे.

याबरोबरच या जमिनींचे हस्तांतरण व्यापारी किंवा निवासी वापरासाठी करावयाचे असल्यास त्यासाठी नगर विकास विभागाच्या २३ नोव्हेंबर २००७ च्या शासन निर्णयातील शुल्क आकारणी कायम राहणार आहे.

-----o-----

## मराठवाड्यातील दुष्काळावरील उपाययोजनांसाठी इस्त्रायलच्या मेकोरोट कंपनीसोबत सामंजस्य करार

अपुऱ्या आणि अनियमित पर्जन्यमानामुळे मराठवाड्यात सातत्याने उद्‌भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सतत उद्‌भवणाऱ्या पाणी टंचाईमुळे २०१६ च्या उन्हाळ्यामध्ये मराठवाड्याला ४००० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करावा लागला होता. याशिवाय तात्पुरत्या पाणी पुरवठा उपाययोजना हाती घ्यावा लागल्या होत्या. तसेच लातूर शहराला ३०० किमीवर असलेल्या मिरज येथून रेल्वेद्वारे पाणी पुरवण्यात आले होते. या दुष्काळी परिस्थितीवर खात्रीशीर व कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून ग्रामीण तसेच शहरी भागाला पाणी पुरवठा करण्याच्या कायमस्वरुपी उपाययोजनांचा आराखडा आखण्यात येत आहे.

मराठवाडा विभागातील सरासरी पर्जन्यमान ७०० मिमी एवढे असून हे पर्जन्यमान क्षेत्रनिहाय वेगवेगळे असल्याने उपलब्ध पाणीसाठा बऱ्याच वेळा पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा पुरेसा नसतो. मराठवाड्याची तहान भागवण्यासाठी एकूण १७.९२ टीएमसी एवढ्या पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्व शहरे, गावे व वाड्यांना उपलब्ध असलेल्या पाटबंधारे जलसाठ्यांतून ग्रीड पद्धतीने किंवा इतर मार्गांनी पाणी पुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने मराठवाड्याला ग्रीडद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी ६ डिसेंबर २०१६ रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली.

अत्यंत कमी पर्जन्यमान असूनसुद्धा पाणी पुरवठ्याबाबत सक्षम व्यवस्था उभारण्यात यश आलेल्या मध्य-पूर्वेतील इस्त्रायलचा अनुभव महाराष्ट्रासाठी उपयोगाचा ठरु शकत असल्याने त्यांच्या याबाबतच्या ज्ञानाचा मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे. मराठवाड्याची पाणी पुरवठ्याची सक्षम व्यवस्था उभारण्यासाठी सहकार्य करण्यासाठी इस्त्रायल सरकानेही उत्सुकता दाखवली असून इस्त्रायल शासनाच्या नॅशनल वॉटर कंपनीची उपकंपनी असलेल्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास आज मान्यता देण्यात आली. ही कंपनी इस्त्रायल सरकारचा स्वत:चा उपक्रम असून इस्त्रायलमधील ८५ टक्के घरगुती पाण्याची व ७० टक्के पाण्याची मागणी या कंपनीद्वारे पूर्ण केली जाते.

या कंपनीद्वारे मराठवाड्यातील पाणी पुरवठ्यावर उपाययोजना आखण्यासाठी सरासरी पर्जन्यमान, धरणाची साठवण क्षमता, जलसंधारण, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण, नदी खोऱ्यांमध्ये उपलब्ध असणारे पाणी, समुद्राचे पाणी गोडे करणे इत्यादी सर्वंकष प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी इस्त्रायल सरकारचे तांत्रिक सहाय्य घेण्यासाठी इस्त्रायल सरकारसोबत सामंजस्य करार करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. यासंदर्भात पुढील कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून त्यानुसार इस्त्रायलचे प्रधानमंत्री व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या कंपनीशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

-----०-----

महिला व बालविकास विभाग

## पुनर्वसनासाठी क्रांतिकारक निर्णय

## अनाथ मुलांना एक टक्के आरक्षण मंजूर

राज्यातील अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात एक टक्के समांतर आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अनाथ मुलांचे पुनर्वसन आणि त्यांचे भवितव्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला.

अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर खुल्या जगात वावरताना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः त्यांचा प्रवर्ग निश्चित नसल्याने शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती आणि लाभांपासून वंचित राहावे लागत होते. अनाथ मुलांच्या या समस्या ध्यानात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आरक्षणाचा लाभ मिळवून देऊ, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज हा विषय मंत्रिमंडळ बैठकीत ठेवण्यात आला आणि त्याला मंजुरी देण्यात आली. या आरक्षणामुळे अनाथ मुलांच्या पुनर्वसनाला आणखी बळकटी मिळणार आहे.

-----o-----

मृद् व जलसंधारण विभाग

## अधिनियमामध्ये सुधारणेस मंजुरी

## जलसंधारण महामंडळाच्या सदस्य संख्येत वाढ

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या कामकाजात संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींचा समावेश होण्यासह लोकसहभाग वाढावा, यासाठी महामंडळाच्या सदस्य संख्येत आणखी दोन तज्ज्ञ सदस्यांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम-२००० मधील कलमामध्ये त्यासाठी सुधारणा करण्यात येणार आहे.

राज्यामध्ये जलसंधारणाचा विशेष कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जून १९९२ मध्ये जलसंधारण विभाग स्थापन केला. त्यानंतर महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम-२००० नुसार महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना २२ ऑगस्ट २००० रोजी करण्यात आली. त्यानुसार राज्यातील सामाजिक वनीकरण तसेच २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लघु पाटबंधारे प्रकल्पांसह पाणलोट आणि जलसंधारण कामांचा शीघ्र विकास व नियमन करण्यात येते. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम २००० मधील कलम ४ (१) नुसार महामंडळाच्या सदस्यांची रचना ठरविण्यात आली आहे.

सामाजिक वनीकरण, पाणलोट, जलसंधारण इत्यादी कामांची फलनिष्पत्ती ही लोकसहभागावर अवलंबून असते. जलयुक्त शिवार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे. यामुळे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग मिळविण्यासाठी महामंडळाच्या सदस्यांमध्ये दोन नवीन सदस्यांचा समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये जलसंधारण व मृद्संधारण क्षेत्राची विशेष माहिती तसेच प्रत्यक्ष अनुभव असलेले, त्याचप्रमाणे लोकसहभागातून जलसंधारण करण्याबाबत पूर्व अनुभव असलेले दोन सदस्य राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील. यापैकी एक सदस्य हा उपाध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करण्यात येईल.

-----o-----